# महाराष्ट्र शासन

क्रमांक :- डब्ल्युएलपी -०८१६/प्र.क्र.२७६ /फ-१

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
ई-मेल- osdf1wl@gmail.com
दिनांक :-११ नोव्हेंबर, २०१६.

प्रति,

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), तथा
सदस्य सचिव, राज्य वन्यजीव मंडळ,
महाराष्ट्र राज्य, नागपूर.

**विषय** :- राज्य वन्यजीव मंडळाच्या १२ वी बैठक कार्यवृत्तांतास मान्यता देण्याबाबत.

**संदर्भ** :- आपले पत्र क्र.कक्ष-२३(२)/प्र.क्र. २१५/२८२५/२०१६-१७, दिनांक :- ०२.११.२०१६.

महोदय,

दिनांक २६.१०.२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. मुख्यमंत्री यांचे समिती सभागृह, मंत्रालय, मुंबई येथे राज्य वन्यजीव मंडळाची १२ वी बैठक आयोजित करण्यात आली होती. संदर्भिय पत्रान्वये आपण मान्यतेसाठी सादर केलेल्या सदर बैठकीचे मराठी कार्यवृत्तांत आवश्यक त्या दुरुस्तीसह मा. मुख्यमंत्री तथा अध्यक्ष राज्य वन्यजीव मंडळ यांनी मान्यता दिली आहे.

मा. मुख्यमंत्री तथा अध्यक्ष राज्य वन्यजीव मंडळ यांनी मान्यता दिलेले राज्य वन्यजीव मंडळाच्या १२ वी बैठकीचे मराठी कार्यवृत्तांत सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. तसेच मराठी कार्यवृत्तांच्या अनुषंगाने इंग्रजी कार्यवृत्तांत तयार करुन दोन्ही कार्यवृतांत मंडळाच्या सदस्यांना तसेच शासनास तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावे.

आपणास विनंती की तदनुषंगाने आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी.

सहपत्र :- वरील प्रमाणे.

(अरविंद आपटे)
विशेष कार्य अधिकारी
महसूल व वन विभाग

# <u>महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाची १२ वी बैठक, दिनांक २६ ऑक्टोबर २०१६ रोजीचे कार्यवृत्तांत</u>

महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाची १२ वी बैठक बुधवार दिनांक २६ ऑक्टोंबर २०१६ रोजी मंडळाचे अध्यक्ष तथा मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, नामदार श्री. देवेन्द्र फडणवीस यांचे अध्यक्षतेखाली **मा. मुख्यमंत्री यांचे समिती कक्ष, मुख्य इमारत, ६ वा मजला, मंत्रालय,** मुंबई येथे सकाळी ११.०० वाजता संपन्न झाली. बैठकीतील इतर उपस्थितांची नांवे सोबतच्या यादीत दिलेली आहेत. **(परिशिष्ट - १)**

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष तथा मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व मा. उपाध्यक्ष तथा मा. मंत्री (वने) यांचे व नवीन सदस्य श्री. किशोर रिठे, श्री. श्रीकांत टेकाडे व श्रीमती पूनम धनवटे, श्री. बंडू धोतरे यांचे स्वागत केले. सदस्य सचिव यांनी बैठकीची पार्श्वभूमी व बैठकीत ठेवण्यांत आलेल्या विषयांबाबत प्रास्ताविक केले. त्यानंतर बैठकीत विषयसूचीप्रमाणे मुद्येनिहाय चर्चा झाली. बैठकीत देण्यांत आलेली माहिती, झालेली चर्चा व मंडळाने घेतलेले निर्णय खालीलप्रमाणे आहेत.

**<u>विषय क्रमांक १</u> : दिनांक ०५ एप्रिल २०१६ रोजी मुंबई येथे झालेल्या ११ व्या बैठकीचे कार्यवृत्तांत कायम करणे.**

| अ.क्र. | मुद्दा | झालेली चर्चा | घेतलेले निर्णय |
|---|---|---|---|
| ०१ | **दिनांक ०५ एप्रिल २०१६ रोजी मुंबई येथे झालेल्या ११ व्या बैठकीचे कार्यवृत्तांत कायम करणे.** | दिनांक ०५ एप्रिल २०१६ रोजीचे कार्यवृत्तांत सर्व सदस्यांना पाठविण्यांत आलेले असून त्यावर कोणत्याही सदस्यांकडुन अभिप्राय प्राप्त झालेले नाहीत असे सदस्य सचिव तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी मंडळाचे निदर्शनास आणून दिले. **परंतु मंडळाचे सदस्य श्री. किरण शेलार यांनी असा मुद्या उपस्थित केला की, " प्रत्येक व्याघ्र प्रकल्प व संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, मुंबई येथे वन विभागामार्फत पशुवैद्यकीय अधिका-यांची पदे भरण्यांत** | **११ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतामध्ये पशुवैद्यकीय अधिका-यांच्या पदांबाबत यापूर्वी दिलेल्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही करण्याबाबतची नोंद घेण्यांत येऊन सदर बैठकीच्या कार्यवृत्तांतास मान्यता प्रदान करण्यात आली.** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | यावी जेणेकरुन त्याक्षेत्रात कायम पशुवैद्यकीय अधिकारी उपलब्ध राहतील" हा विषय मागील बैठकीच्या कार्यवृत्तांतामध्ये नोंदविण्यांत आलेला नाही. त्यावर मा. अध्यक्ष महोदयांनी त्यांना सूचित केले की, ही बाब जर आपणांस कार्यवृत्तांत मिळाल्या-बरोबर निदर्शनास आणून देण्यांत आली असती तरी त्यामध्ये दुरुस्ती करता येऊ शकली असती. तथापि सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्याचा कार्यवृतांतात समावेश करण्यात यावा. | |

**विषय क्रमांक २ : महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाच्या दिनांक ०५ एप्रिल २०१६ रोजी झालेल्या ११ व्या बैठकीत घेतलेल्या निर्णयांवर केलेली कार्यवाही.**

| अ.क्र. | मुद्दा | झालेली चर्चा | घेतलेले निर्णय |
|---|---|---|---|
| ०१ | **महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाच्या दिनांक ०५ एप्रिल २०१६ रोजी झालेल्या ११ व्या बैठकीत घेतलेल्या निर्णयांवर केलेली कार्यवाही.** | याबाबतची माहिती सादरीकरणाचे माध्यमातून मंडळासमोर ठेवण्यांत आली व दिनांक ०५ एप्रिल २०१६ रोजीच्या बैठकीत घेण्यांत आलेल्या निर्णयांची माहिती १२ व्या बैठकीच्या विषयसूची समवेत परिशिष्ट - २ म्हणून जोडण्यांत आली असल्याचे निदर्शनास आणून दिले. | यास मंडळाने मान्यता प्रदान केली व कार्यवाही न झालेल्या मुद्यांवर तात्काळ कार्यवाही पूर्ण करावी असे निर्देश देण्यात आले. |

विषय क्रमांक ३ : बिबट सफारी निर्मितीबाबत.

| अ.क्र. | मुद्दा | झालेली चर्चा | घेतलेले निर्णय |
|---|---|---|---|
| ३.१ | **अमरावती व पुणे जिल्हयात बिबट सफारी निर्मितीबाबत** | महाराष्ट्र राज्यात विविध ठिकाणी मानव-बिबट संघर्षाच्या घटना घडत असतात, अशा वेळी बिबट्यांना जेरबंद करावे लागते. केन्द्र शासनाने ठरवून दिलेल्या प्रमाणभुत कार्यपध्दती अनुसार अशा बिबटयांचे संरक्षण व संगोपन करणे आवश्यक असते. बिबट या वन्यप्राण्याला जेरबंद केल्यानंतर लगेच किंवा कालांतराने निसर्गमुक्त करणे बंधनकारक आहे. सदर विखुरलेल्या ठिकाणी जेरबंद असलेल्या बिबट्यांचे प्रभावीरित्या संगोपन व व्यवस्थापन करणे कठीण जाते. त्यामुळे एका ठिकाणी विशिष्ट परिसरात व्यवस्थापन, संरक्षण व संगोपन करण्यास सोईस्कर व्हावे म्हणुन बिबट सफारी ही संकल्पना पुढे आलेली आहे. या सर्व प्रयत्नांची फलश्रुती म्हणुन बिबट या वन्यजीवाचे प्रभावी संरक्षण व संगोपन करण्याकरिता अमरावती जिल्हयातील वडाळी व पुणे जिल्हयातील जुन्नर येथे " **बिबट सफारी** " तयार करण्याची संकल्पना पुढे आलेली आहे.<br>या सर्व बाबी सादरीकरणाचे माध्यमातून मंडळासमोर मांडण्यांत आल्या. मा. उपाध्यक्ष तथा मंत्री (वने) यांनी याबाबत यापूर्वी बोरीवली व चंद्रपूर येथे बिबट सफारी स्थापन करण्याचे जे प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्यांत आले त्यांस अजून मंजूरी कां प्राप्त झाली नाही ? याची शहानिशा करावी व केंद्र शासन/ केंद्रिय चिडीयाघर प्राधिकरणाकडून काही आक्षेप नोंदवले गेले असतील तर त्याची तात्काळ पूर्तता करावी असे निर्देश दिलेत. | **चर्चेच्या वेळी दिलेल्या निर्देशाचे पालन करुन केंद्र शासन / केंद्रिय चिडीयाघर प्राधिकरणाकडून जे आक्षेप नोंदवले गेले असतील त्यांची तात्काळ पूर्तता करुन त्याबैठकी मध्ये मान्यता दिलेल्या ठिकाणी बिबट सफारी स्थापित करण्याची कार्यवाही लवकरात लवकर करावी व त्यासोबतच अमरावती व पुणे वृत्तातील वडाळी व जुन्नर येथे बिबट सफारी निर्मितीबाबत कार्यवाही करण्यास मान्यता प्रदान केली.** |

विषय क्र. ४ राष्ट्रीय उद्यान / अभयारण्य क्षेत्रामधील विकासात्मक कामे, वनजमीन वळतीकरण.

| अ.क्र. | मुद्दा | झालेली चर्चा | घेतलेले निर्णय |
| --- | --- | --- | --- |
| ४.१ | **संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली येथे गोरेगांव-मुलुंड दरम्यान भूमीगत बोगदा तयार करण्याकरीता भू-तकनिकी सर्व्हेक्षण करण्यास परवानगी मिळणेबाबत.** | मुंबई महानगर पालिकेमार्फत गोरेगांव-मुलुंड, लिंक रोड, पूर्व-पश्चिम वाहतुकीच्या दृष्टीने सोयीचे होण्याकरीता गोरेगांव पासून (जेथे रस्ते एकमेकांना ओलांडतांत (क्रॉसिंग)) तेथे संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे आतून अंदाजे ४.७ कि.मी. लांबीचा भुयारी मार्ग प्रस्तावित केलेला आहे. सदर भुयारी मार्गामुळे सद्यस्थितीत पश्चिम एक्सप्रेस महामार्ग आणि जुने जोगेश्वरी ते विक्रोली लिंक रोड या मार्गावरील अतिवर्दळीची होणारी वाहतुक कमी करणे हा मुख्य उद्देश असल्याने व खालील बाबींचा विचार करुन सदर प्रकल्पाचे सर्वेक्षण करण्यांस परवानगी देण्यास्तव मंडळासमोर प्रस्ताव सादर करण्यात आला. मुंबई महानगरपालीकेचे अतिरीक्त आयुक्त यांनी सादरीकरणाद्वारे मांडले.<br>१) Shortest alignment route.<br>२) Faster and cost effective East-West connectivity of Mumbai Suburban City.<br>३) To minimize the travel time and distance.<br>४) To minimize congestion of traffic on Western-Express Highway.<br>५) Saving in fuel consumption.<br>६) To facilitate easier assess for the commuter to travel from Western-Express Highway to Eastern-Express Highway.<br>सदर प्रकल्पाबाबत राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीमध्ये विस्ताराने चर्चा झाली. सर्वप्रथम सदस्य सचिव यांनी केंद्र शासनाचे | **राज्य वन्यजीव मंडळाची सहमती झाल्याप्रमाणे सदर सर्व्हेक्षण Non-invasive स्वरूपाचे असल्यामुळे केंद्र शासनाच्या निर्देशानुसार सदर कामाची परवानगी देण्याचे अधिकार मुख्य वन्यजीव रक्षक यांनाच असल्याने त्यांनी पुढील कार्यवाही करावी.** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पत्र क्र. एफ.नं. ६-१३३ /२०१४ (पार्ट), दि. २६/०९/१४ आणि एफ.नं. ११-३०६/२०१४-एफसी, दि. ०७/१०/१४ त्या मधील ठळक मुद्ये वाचून दाखवीले. पत्रांमधील मजकुराप्रमाणे मंडळाच्या असे निदर्शनास आणून दिले की, केंद्र शासनाचे दोन्ही पत्रांमध्ये मोघम स्वरूपाचे निर्देश देण्यात आलेले आहेत. या कारणास्तव सदर प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी प्रस्ताव राज्य वन्यजीव मंडळापुढे ठेवण्यात आलेला आहे.<br>वरील केंद्र शासनांच्या पत्रांच्या अनुषंगाने तसेच मुख्य वन्यजीव रक्षक तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी त्यांचे पत्र क्र. कक्ष-२३(२)/सर्व्हे/वजी/प्र.क्र. ११९/१९१५, दि. १९/०८/२०१६ अन्वये शासनास सादर केलेला आहे. या संबंधाने मंडळाच्या सदस्यांसमोर सविस्तर चर्चा झाली.<br>चर्चेदरम्यान वन्यजीव (संरक्षण) अधिनियमातील ३५(६) च्या तरतूदीकडे लक्ष वेधण्यात आले. राष्ट्रीय उद्यानातून वन्यजीव काढावयाचे (removal of wildlife) असल्यास राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या शिफारसीची आवशकता आहे. सदर सर्वेक्षणाच्या कामात वन्यजीव काढणे अपेक्षित नाही, त्यामुळे राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या शिफारसीची आवशकता नाही<br>चर्चेनंतर सहमती झाल्याप्रमाणे केंद्र शासनाचे उपरोक्त पत्रांप्रमाणे सदर सर्व्हेक्षण Non-invasive स्वरूपाचे असल्यामुळे मुख्य वन्यजीव रक्षक यांनाच सदर अधिकार आहेत. त्यामुळे याबाबतची कार्यवाही मुख्य वन्यजीव रक्षक यांनी त्यांचे स्तरावरून करावी. | |
| ४.२ | **ठाणे ते बोरीवली या मार्गावर टाटा इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीमार्फत रोप वे** | टाटा रिअल्टी आणि इन्फ्रास्ट्रक्चर लिमी. मुंबई यांनी ठाणे ते बोरीवली या मार्गावर रोप-वे बांधण्यासाठी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे वनक्षेत्रातुन प्रस्तावित रोप-वेचा सर्व्हेक्षण व अन्वेक्षण करणे बाबतचा प्रस्ताव प्राप्त | **राज्य वन्यजीव मंडळाची सहमती झाल्याप्रमाणे केंद्र शासनाचे उपरोक्त पत्रांप्रमाणे सदर सर्व्हेक्षण Non-** |

| | | | |
|---|---|---|---|
| | बांधण्यासंदर्भातील प्रकल्पाबाबत. | झालेला आहे. त्याबाबत खालील उद्देशांची पूर्तता करावयची आहे.<br>१) Thane-Borivali Ropeway project is in preliminary stage.<br>२) The project proponent have not finalized the alignment as of today.<br>३) Current application is only for topographical survey and alignment survey which will help us to finalize the alignment.<br>४) This will not involve any geotechnical survey or borings which might disturb the soil or flora / fauna of the surrounding. No bore holes will be taken nor felling of trees or bushes will be involved.<br>५) No trial pits will be taken and no area will get affected.<br>६) No tree will be cut down for topographic and alignment survey.<br>The actual area affected and project design can only be calculated after finalization of the alignment and / or output of the topographical survey.<br>सदर प्रकल्पामुळे मुंबई उप महानगर शहरातील वर्दळीच्या वाहतुकीची कोंडी कमी होणार असून पर्यावरणाला फायदेशिर राहील.<br>सदर प्रकल्पाबाबत राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीमध्ये विस्ताराने चर्चा झाली. सर्वप्रथम सदस्य सचिव यांनी केंद्र शासनाचे पत्र क्र. एफ.नं. ६-१३३ /२०१४ (पार्ट), दि. २६/०९/१४ आणि एफ.नं. ११-३०६/२०१४-एफसी, दि. ०७/१०/१४ त्या मधील ठळक मुद्ये वाचून दाखवीले. पत्रांमधील | **invasive स्वरूपाचे असल्यामुळे मुख्य वन्यजीव रक्षक यांनाच सदर अधिकार असल्याने याबाबतची कार्यवाही मुख्य वन्यजीव रक्षक यांनीच त्यांचेच स्तरावरूनच करावी, असे निर्देशित करण्यात आले.**<br>**तसेच या पुढेसुध्दा ज्या बाबींची पूर्तता राज्य स्तरावर होणे शक्य आहे, त्याबाबींसाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही करू नये, असे निर्देशित करण्यात आले.** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मजकुराप्रमाणे मंडळाच्या असे निदर्शनास आणून दिले की, केंद्र शासनाचे दोन्ही पत्रांमध्ये मोघम स्वरूपाचे निर्देश देण्यात आलेले आहेत. या कारणास्तव सदर प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी प्रस्ताव राज्य वन्यजीव मंडळापूढे ठेवण्यात आलेला आहे.<br>वरील केंद्र शासनांच्या पत्रांच्या अनुषंगाने तसेच मुख्य वन्यजीव रक्षक तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी त्यांचे पत्र क्र. कक्ष-२३(२)/सर्व्हे/वजी/प्र.क्र. १५८/२०५७, दि. ३०/०८/२०१६ अन्वये शासनास सादर केलेला आहे. या संबंधाने मंडळाच्या सदस्यांसमोर सविस्तर चर्चा झाली. चर्चेदरम्यान वन्यजीव (संरक्षण) अधिनियमातील ३५(६) च्या तरतूदीकडे लक्ष वेधण्यात आले. राष्ट्रीय उद्यानातून वन्यजीव काढावयाचे (removal of wildlife) असल्यास राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या शिफारसीची आवशकता आहे. सदर सर्वेक्षणाच्या कामात वन्यजीव काढणे अपेक्षित नाही, त्यामुळे राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या शिफारसीची आवशकता नाही<br>चर्चेनंतर सहमती झाल्याप्रमाणे केंद्र शासनाचे उपरोक्त पत्रांप्रमाणे सदर सर्व्हेक्षण Non-invasive स्वरूपाचे असल्यामुळे मुख्य वन्यजीव रक्षक यांनाच सदर अधिकार आहेत. त्यामुळे याबाबतची कार्यवाही मुख्य वन्यजीव रक्षक यांनी त्यांचे स्तरावरून करावी.<br><br>चर्चेदरम्यान वन्यजीव (संरक्षण) अधिनियमातील ३५(६) च्या तरतूदीकडे लक्ष वेधण्यात आले. राष्ट्रीय उद्यानातून वन्यजीव काढावयाचे (removal of wildlife) असल्यास राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या शिफारसीची आवशकता आहे. सदर सर्वेक्षणाच्या कामात वन्यजीव काढणे अपेक्षित नाही, त्यामुळे राष्ट्रीय वन्यजीव | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मंडळाच्या शिफारसीची आवशकता नाही<br>चर्चेनंतर सहमती झाल्याप्रमाणे केंद्र शासनाचे उपरोक्त पत्रांप्रमाणे सदर सर्व्हेक्षण Non-invasive स्वरूपाचे असल्यामुळे मुख्य वन्यजीव रक्षक यांनाच सदर अधिकार आहेत. त्यामुळे याबाबतची कार्यवाही मुख्य वन्यजीव रक्षक यांनी त्यांचे स्तरावरून करावी. | |

<u>संरक्षित क्षेत्राच्या प्रस्तावित पर्यावरण संवेदनशील क्षेत्राबाहेरील प्रस्तावित इतर विकास कामाचे प्रकल्प प्रस्ताव.</u>

**<u>विषय क्रमांक</u> ५, ६, ८.१, ८.२ व ८.३ या विषयांचे स्वरुप एकच असल्याने हे सर्व विषय संलग्नीत करुन एकत्रित चर्चा करण्याबाबतचा प्रस्ताव सदस्य सचिव तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांनी मांडला व मंडळाने त्यास मान्यता दिल्याने वरील विषयांवर एकत्रीत चर्चा करण्यांत येऊन त्यावर घेतलेला निर्णय खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | मुद्दा | झालेली चर्चा | घेतलेले निर्णय |
|---|---|---|---|
| ५.१ | मेसर्स लार्सन्स ॲन्ड टर्बो लिमी. यांचा मोजे तुंगवा येथील सिटी सर्वे क्र. ११२ व ११५ तसेच मौजे पासपोली, साकी विहार रोड, पवई, मुंबई येथील सिटी सर्वे क्र. ८६ व ८७ येथे निवासी व व्यवसायीक बांधकाम प्रस्ताव. :- संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली. | १. केंद्र शासनाकडून संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या पर्यावरण संवेदनशील क्षेत्राबाबत अंतीम अधिसूचना लवकरच निर्गमीत होण्याची शक्यता असल्याने जे प्रकल्प संजय गांधी राष्ट्रीय उद्यानापासून दहा किलोमीटरच्या आत तथापि प्रस्तावित पर्यावरण संवेदनशील क्षेत्राच्या बाहेर आहेत अशा प्रकल्पांची राष्ट्रीय वन्यजीव मंडळाकडे शिफारस करावी असे मा. मुख्यमंत्री तथा अध्यक्ष राज्य वन्यजीव मंडळ यांनी | राज्य वन्यजीव मंडळाच्या दिनांक ०४/१२/२०१५ रोजी १० व्या बैठकीमध्ये घेण्यांत आलेल्या धोरणात्मक निर्णयाप्रमाणे जे प्रकल्प संजय गांधी राष्ट्रीय उद्यानापासून दहा किलोमीटरच्या आत तथापि प्रस्तावित पर्यावरण संवेदनशील क्षेत्राच्या बाहेर आहेत अशा प्रकल्पांची राष्ट्रीय वन्यजीव मंडळाकडे शिफारस करावी असे ठरविण्यांत आले होते. यास्तव |
| ५.२ | मेसर्स नहालचंद लालुचंद प्रायव्हेट लिमी. यांचा मोजे दहिसर ता. बोरीवली जि. मुंबई उपनगर येथील सर्व्हे क्रमांक ३२९/१(CTS No. १४७८/C) ३२९/३ (१४७६/A), ३२९/४ (१४७५/A) ३२९/६ (१४७४/C), ३२९/७ (१४७२/A) ३२७/२ (१४५८/१), ३२७/३ (१४५७/A) ३२७/६, (१४५६), ७/४ (१४५४/A), | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | ३२७/७ (१४५५/A) & ३२७/८ (१४५३) येथे निवासी व व्यवसायीक बांधकामाबाबत. | बैठकीमध्ये निर्देश दिले आहेत.<br>२. जे बांधकामाचे प्रस्ताव प्रस्तावित पर्यावरण संवेदनशील क्षेत्राच्या बाहेर येत असल्याने त्यांची यापूर्वीच्या राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीत शिफारस करण्यात आली आहे व ज्यांची राष्ट्रीय वन्यजीव मंडळानेही शिफारस केली आहे अशा प्रकल्पधारकांकडून प्रकल्प रक्कमेच्या २ किंवा ३ % ऐवजी एकरकमी रू. १.०० कोटी एवढी रक्कम वन्यप्राण्यांच्या वसतीस्थानांचा विकास आणि संरक्षण या कामाकरिता संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरिवली यांचेकडे जमा करण्यात यावी असे निर्देश मा. मुख्यमंत्री तथा अध्यक्ष राज्य वन्यजीव मंडळ यांनी चर्चेच्या वेळी दिले.<br>३. याशिवाय मा. मुख्यमंत्री तथा अध्यक्ष राज्य वन्यजीव मंडळ यांनी खालीलप्रमाणे निर्देश दिलेत व त्यास मंडळाच्या सर्व | संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या प्रस्तावित पर्यावरण संवेदनशील क्षेत्राच्या बाहेर असलेल्या विकास कामाच्या प्रस्तावांची शिफारस प्रकल्पधारकांकडुन एकरकमी रू. १.०० कोटी एवढी रक्कम वन्यप्राण्यांच्या वसतीस्थानांचा विकास आणि संरक्षण या कामाकरिता संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली यांचेकडे जमा करण्यात यावी व मुख्य वन्यजीव रक्षक यांनी घातलेल्या इतर अटीसह मंडळाची मान्यता प्रदान करण्यांत आली.<br>तसेच जे बांधकामाचे प्रस्ताव प्रस्तावित पर्यावरण संवेदनशील क्षेत्राच्या बाहेर येत असल्याने त्यांची यापूर्वीच्या राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीत शिफारस करण्यात आली आहे व ज्यांची राष्ट्रीय वन्यजीव मंडळानेही शिफारस |
| ५.३ | मेसर्स इन्क्लाईन रिअल्टी प्रायव्हेट लिमी. यांचा मौजे मागाठाणे दत्तपाडा रोड, बोरीवली पूर्व मुंबई येथील सिटी सर्वे क्र. १०७/E, १४१, १४२, १५५, १५५/१ ते १२ येथे निवासी व व्यवसायीक बांधकामाबाबत. | | |
| ५.४ | मेसर्स ओबेरॉय कन्स्ट्रक्शन्स लिमी. यांचा मौजे दिंडोशी येथील सर्व्हे क्र. ९५/४/B/३ & ९५/४/B/४(pt) आणि मौजे पहाडी, गोरेगांव, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगांव (पूर्व) मुंबई येथील CTS No. ५९०/A/A/१, ५९० A/E१/२A, ५९० A/E१/२B, ५९० A/E१/D२, ५९६/E, ५९६/F मधील निवासी बांधकाम प्रस्तावाबाबत. | | |
| ५.५ | मेसर्स ओबेरॉय कन्स्ट्रक्शन्स लिमी. यांचा मौजे माजस (जोगेश्वरी विक्रोली लिंक रोड) येथील सर्व्हे क्र. १/B, १/C, १/D, १६/A, ३२A(भाग), ३७५ (भाग) येथे निवासी व शाळा बांधकाम प्रस्तावाबाबत. | | |
| ५.६ | मेसर्स ओमकार रिअल्टर्स व विकासक प्राय. लिमी. यांचा मौजे मालाड (पूर्व) मुंबई येथे सिटी सर्वे क्र. ८११ A/७(भाग), ८१२, ८१३, ८१४-A-१ ते A-४, ८२१, ८२४, ८२५ (भाग) & ८४४ येथे निवासी व व्यवसायीक तसेच झोपडपट्टी | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | पुनर्वसन प्रकल्प बांधकामाबाबत | सभासदांनी सहमती दर्शविली. | केली आहे अशा प्रकल्पधारकांकडून |
| ५.७ | मेसर्स व्हि.जी.एस. कन्स्ट्रक्शन्स यांचा मौजे मालाड (पूर्व) श्री क्रिष्ण नगर, जनरल अरूण कुमार मार्ग, जलधारा, गोरंगांव (पूर्व) मुंबई येथे सिटी सर्वे क्र. ८२७-D/१(भाग) & ८२७ - D/२ (भाग) येथे निवासी बांधकाम प्रस्तावाबाबत. | ३.१ बांधकामाचे जे प्रस्ताव प्रस्तावित पर्यावरण संवेदनशील क्षेत्राचे आंत आहेत असे प्रस्ताव पर्यावरण संवेदनशील क्षेत्राची अंतिम अधिसूचना निर्गमीत होईपर्यंत मंडळासमोर मंजूरीस्तव मांडण्यांत येऊ नयेत.<br>३.२ बांधकामाचे जे प्रस्ताव प्रस्तावीत पर्यावरण संवेदनशील क्षेत्राचे बाहेर आहेत असे प्रस्ताव पर्यावरण संवेदनशील क्षेत्राची अंतीम अधिसूचना निर्गमीत होईपर्यंत मंडळासमोर मंजूरीस्तव मांडण्यांत आल्यास त्यांचेकडून रुपये १.०० कोटी एवढी रक्कम एकरकमी वन्यजीवांच्या अधिवासाच्या संवर्धनासाठी जमा करण्यांत येईल अशा आशयाचे हमीपत्र प्रकल्प यंत्रणेकडून प्राप्त करवून नंतरच प्रस्ताव राज्य | प्रकल्प रक्कमेच्या २ किंवा ३ % ऐवजी एकरकमी रू. १.०० कोटी एवढी रक्कम वन्यप्राण्यांच्या वसतीस्थानांचा विकास आणि संरक्षण या कामाकरिता संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरिवली यांचेकडे जमा करण्यात यावी.<br>१. बांधकामाचे जे प्रस्ताव प्रस्तावित पर्यावरण संवेदनशील क्षेत्राचे बाहेर आहेत असे प्रस्ताव पर्यावरण संवेदनशील क्षेत्राची अंतिम अधिसूचना निर्गमीत होईपर्यंत मंडळासमोर मंजूरीस्तव मांडण्यांत आल्यास त्यांचेकडून रुपये १.०० कोटी एवढी रक्कम एकरकमी, वन्यजीवांच्या अधिवासाच्या संवर्धनासाठी जमा करण्यांत येईल अशा आशयाचे हमीपत्र प्रकल्प यंत्रणेकडून प्राप्त करवून घ्यावे. |
| ५.८ | मेसर्स मेरिंग्यु हॉटेल्स प्रायव्हेट लिमी. यांचा मौ. मारोल येथील सिटी सर्व्हे क्र. ७८४, अंधेरी-कुर्ला मार्ग, अंधेरी येथे हॉटेलचे बांधकामाबाबत प्रस्ताव. - | | |
| ५.९ | मेसर्स आयोरा होटेल्स प्रायव्हेट लिमी. यांचा सहार येथील सिटी सर्व्हे क्र. सी-०४, जी.व्हि.के. स्काय सिटी, सिटी सर्व्हे क्र. १४५ अ येथील लेमन ट्री पिमिअर हॉटेल बांधकामाबाबत. | | |
| ५.१० | मेसर्स काकड हॉऊसिंग कॉर्पोरेशन यांचा महाजनवाडी, जि. ठाणे, येथील सर्व्हे क्र. ११५/४, ५, १०, ११, १४, १५, १८, १९, २०, २१, २२, २३, ११६/२, ३, ११७/१ येथील बांधकाम प्रस्तावाबाबत. | | |
| ५.११ | मेसर्स श्रध्दा लँडमार्क प्रायव्हेट लिमी. यांचा मौ. कांजुर गाव, ता. कुर्ला, भांडुप पश्चिम येथील सर्व्हे क्र. १९४ (p), CTS no. ३७४ (p), ३७५, ३७५/१, ३७६, ३७६/१ ते १४, ३७७, ३७७/१ ते ११, ३७८, ३७८/१ ते ४, ३७९, ३७९/१ ते ११, ३८०, ३८०/१ ते ११, ३८१, ३८१/१ ते १०, ३८२, ३८२/१ ते | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | २१, ३८३, ३८३/१ ते २, ३८४, ३८४/१, ३८५, ३८७, ३८८, ३९१, ३९१/१ ते १० येथील बांधकाम प्रस्तावाबाबत. | वन्यजीव मंडळाच्या बैठकीत ठेवण्यात यावे. ३.३ जे बांधकाम प्रस्ताव | २. जे बांधकाम प्रस्ताव प्रस्तावित पर्यावरण |
| ५.१२ | मेसर्स श्रध्दा लँडमार्क प्रायव्हेट लिमी. यांचा मौ. भांडूप गाव, ता. कुर्ला, तलाव रोड तुलशेत पाडा यांचा सिटी सर्व्हे क्र. १६९ CTS No. ११२ (pt), ११२/२ येथील बांधकाम प्रस्तावाबाबत. | प्रस्तावित पर्यावरण संवेदनशील क्षेत्राच्या आत येत असतील त्या प्रकल्प धारकांकडून बांधकाम | संवेदनशील क्षेत्राच्या आत येत असतील त्या प्रकल्प धारकांकडून बांधकाम प्रस्तावाच्या |
| ६.० | पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात बांधकाम प्रकल्पांना मंजुरी देतांना प्रकल्प खर्चाच्या २ % ऐवजी फक्त रू. १.०० कोटी वन्यजीव विकासार्थ रक्कम देण्याबाबत "मे. दोस्ती इंटरप्राईजेस यांचा विनंती अर्ज. | प्रस्तावाच्या अंदाजीत खर्चाच्या २% एवढी रक्कम जमा करण्याचे हमीपत्र घेण्यात यावे व नंतरच राज्य वन्यजीव | अंदाजीत खर्चाच्या २% एवढी रक्कम जमा करण्याच्या हमीपत्रासह घेण्यात येईल व मा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण यांच्या |
| ८.१ | प्रकल्प धारकाकडुन घेण्यात येणारी विकास कामांची रक्कम २% वरून ३% पर्यंत करणेबाबत. | मंडळाच्या बैठकीत ठेवण्यात यावे. मा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण यांची | अटींची पूर्ततासुध्दा केली जाईल. |
| ८.२ | मेसर्स फेरानी हॉटेल्स प्रायव्हेट लिमी. यांचा मौ. मालाड (पूर्व) येथील CTS No. ८२७/A/४A/१ हॉटेल बांधकाम प्रस्तावाबाबत. | परवानगी घेण्याची जबाबदारी प्रकल्प यंत्रणेची राहील | विषय क्रमांक ८.२ मध्ये प्रस्तावित केलेल्या प्रकल्पाच्या बांधकामापैकी ८१.८६% क्षेत्र |
| ८.३ | मेसर्स फेरानी हॉटेल्स प्रायव्हेट लिमी. यांचा मौ. मालाड (पूर्व) येथील CTS No. ८२७/A/४A/१ आणि ८२७ A/१C/१C हॉटेल बांधकाम प्रस्तावाबाबत. | | प्रस्तावीत पर्यावरण संवेदनशील क्षेत्राच्या बाहेर येत असल्यामुळे फक्त बाहेरील क्षेत्रातील बांधकामास, प्रकल्प धारकाने हमीपत्र दिल्यामुळे तसेच सदर प्रकल्पास आयुक्त महानगरपालीका यांनी मंजूरी दिलेल्या आराखडयामध्ये |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | सुध्दा त्याप्रमाणे बदल करुन घेणे प्रकल्पधारकांस आवश्यक राहील. तसेच रुपये १.०० कोटी एवढी रक्कम जमा करण्याच्या अटीवर मंडळाने फक्त ८१.८६ % क्षेत्रावरील बांधकामास मान्यता दिली.<br><br>त्याचप्रमाणे विषय क्रमांक ८.३ मध्ये प्रस्तावित केलेल्या प्रकल्पाच्या बांधकामापैकी ७८.२०% क्षेत्र प्रस्तावीत पर्यावरण संवेदनशील क्षेत्राच्या बाहेर येत असल्यामुळे फक्त बाहेरील क्षेत्रातील बांधकामास प्रकल्प धारकाने हमीपत्र दिल्यामुळे मंडळाने मान्यता दिली तसेच सदर प्रकल्पास आयुक्त महानगरपालीका यांनी मंजूरी दिलेल्या आराखडयामध्ये सुध्दा त्याप्रमाणे बदल करुन घेणे प्रकल्पधारकांस आवश्यक राहील. तसेच रुपये १.०० कोटी एवढी रक्कम जमा करण्याच्या |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | अटीवर फक्त ७८.२० % क्षेत्रावरील बांधकामास मंडळाने मान्यता दिली. |

५. हुमन नदी प्रकल्प, जि. चंद्रपूर. (ताडोबा-अंधारी राष्ट्रीय उद्यान-बफर क्षेत्र).

| अ. क्र | मुद्दा | झालेली चर्चा | घेतलेले निर्णय |
|---|---|---|---|
| ५.१३ | हुमन नदी प्रकल्प, जि. चंद्रपूर. (ताडोबा-अंधारी राष्ट्रीय उद्यान-बफर क्षेत्र). | मा. उपाध्यक्ष तथा मंत्री (वने) यांनी हुमन प्रकल्पासंदर्भात स्थानिक नागरिकांची व्यथा व त्या प्रकल्पाची गरज याबाबत सखोल मार्गदर्शन करुन त्याविषयी चर्चा करण्यात आलेली असून त्यावर सदर प्रकल्पामुळे प्रभावित होणा-या गावांचे तसेच तेथील राहणा-या गावक-यांवर होणा-या परिणामासंदर्भात आढावा घेणे आवश्यक असल्याचे सदस्यांनी मत व्यक्त केले.<br>मंडळाचे सदस्य श्री. किशोर रिठे, श्री. अनिष अंधेरिया, श्रीमती पुनम धनवटे यांनी सादरीकरणाच्या माध्यमातून हुमन प्रकल्पामुळे ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पावर होणारे दुष्परिणाम उदा. हुमन नदी प्रकल्प पुर्ण केल्यास ताडोबा-अधारी व्याघ्र प्रकल्पाच्या कॉरिडोर खंडीत होईल व कालांतराने ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प बेटासारखा (Island) होईल. त्यामुळे या प्रकल्पाविषयी, वरील सदस्यांनी नकारात्मक भूमिका मंडळासमोर मांडली. | सचिव (वने), प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य व जलसंपदा विभागाचे प्रतिनिधी तथा इतर ३ सदस्य यांची तज्ञ समिती तयार करून सदर प्रकल्पामुळे प्रभावित होणा-या गावांची पाहणी तसेच स्थानिक गावक-यांशी चर्चा करूनच होणा-या परिणामासंदर्भात अहवाल तयार करून शासनास सादर करण्यात यावा आणि मंडळाच्या पुढील बैठकीत चर्चेस्तव ठेवण्यात यावा, असे मंडळाने निर्देश दिलेत. |

**विषय क्र. ७ :- सह्याद्री भू-प्रदेशातील अभयारण्यामधून संशोधन कामासाठी वन्यजीवांचे जिवंत नमुने गोळा करण्यासाठी परवानगी देणेबाबत.**

| अ. क्र | मुद्या | झालेली चर्चा | घेतलेले निर्णय |
|---|---|---|---|
| ७ | **सहयाद्री भू-प्रदेशातील अभयारण्यामधून संशोधन कामासाठी वन्यजीवांचे जिवंत नमुने गोळा करण्यासाठी परवानगी देणेबाबत.** | श्री तेजस ठाकरे यांनी सहयाद्री भू-प्रदेशातील संरक्षित क्षेत्रामधून (उदा. कोयना, राधानगरी, तानसा, भिमाशंकर, कळसुबाई आणि कर्नाळा अभयारण्य) संशोधन कामासाठी खेकडा (Ghatiana, *Gubernatoriana, Ingletelphusa & Barytelphua)* या वन्यजीवांचे जिवंत नमुने गोळा करण्यास परवानगी मिळणे बाबत विनंती केलेली आहे.<br>अर्जदाराने सादर केलेल्या अर्जानुसार सहयाद्री भू-प्रदेशातील संरक्षित क्षेत्रामधून (उदा. कोयना, राधानगरी, तानसा, भिमाशंकर, कळसुबाई आणि कर्नाळा अभयारण्य) वन्यजीवांचे जिवंत नमूने गोळा करण्याचे मुख्य उद्येश प्राणी समुहांचे प्रजाती स्तरापर्यंत शास्त्रीय पध्दतीने अभ्यास/संशोधन करणे हा आहे.<br>अभयारण्य क्षेत्रातून वन्यजीव / वनस्पतीचे नमूने गोळा करण्याबाबत वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ चे कलम-२९ मध्ये खालीलप्रमाणे नमूद करण्यात आले आहे.<br>**कोणतीही व्यक्ती मुख्य वन्यजीव रक्षक यांचेकडून परवाना प्राप्त केल्याशिवाय अभयारण्य क्षेत्रात कोणतेही वन्यजीव किंवा वनउपज नष्ट करू शकत नाही किंवा क्षेत्राबाहेर काढू शकत नाही. तसेच मुख्य वन्यजीव रक्षक याबाबत राज्य शासन जोपर्यंत राज्य वन्यजीव मंडळाशी सल्लामसलत करून पुर्व परवानगी देत नाही तोपर्यंत परवाना जारी करू शकत नाही.**<br>**प्रस्तावावर चर्चेमध्ये श्री तेजस ठाकरे, हे खेकडा या प्रजातीचे नमुने** | **श्री तेजस ठाकरे यांनी खेकडा या प्रजातीचे नमुने अभयारण्यामधून संशोधन कामासाठी गोळा करण्यास वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ चे कलम २९ अन्वये परवानगी देण्यासाठी मंडळाने खालील अटींवर मान्यता प्रदान केली**<br>**१) नमुन्यांची संख्या न्यूनतम असावी.**<br>**२) नमुने गोळा करण्यासाठी विशिष्ट कालावधी नेमून देण्यात यावा.**<br>**३) नमुने गोळा करण्याचे काम वन विभागाच्या देखरेखीखाली व्हावे.** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अभयारण्यामधून संशोधन कामासाठी गोळा करणार आहेत. नमुन्याची संख्या अतिशय कमी असल्याने खेकडा प्रजातिच्या एकूण संख्येवर तसेच अभयारण्य अधिवासावर विपरीत परिणाम होणार नसल्याचे मुख्य वन्यजीव रक्षक यांनी मंडळाचे निदर्शनास आणून दिले. | |

विषय क्रमांक ८ :- अध्यक्ष महोदयांचे परवानगीने वेळेवर उपस्थित होणारे विषय

| अ. क्र | मुद्दा | झालेली चर्चा | घेतलेले निर्णय |
|---|---|---|---|
| ८. ४ | अतिरिक्त संरक्षित क्षेत्र अधिसूचीत करणेबाबत | कोयना अभयारण्याचे जे १०० चौ.कि.मी. क्षेत्र यापूर्वी कमी करण्यांत आले होते, सदर कमी करावयाच्या क्षेत्राऐवजी ५ अभयारण्ये घोषित करण्याचे निर्देश असल्याने ५ नवीन संरक्षित क्षेत्र घोषित करण्याचे प्रस्तावित करण्यांत आले असून त्यापैकी ३ क्षेत्रे संरक्षित क्षेत्र म्हणून घोषित करण्यांत आलेली आहेत. तथापि २ संरक्षित क्षेत्रे घोषित करण्यास अडचण असल्याने त्याऐवजी इतर क्षेत्र संरक्षित क्षेत्रे घोषित करण्याचे प्रस्तावित आहे. | यावर उपाध्यक्ष तथा मा. मंत्री (वने) यांनी त्यांचेशी वेगळयाने चर्चा करण्याचे निर्देश दिलेत व त्यावर मा. मुख्यमंत्री तथा अध्यक्ष राज्य वन्यजीव मंडळ यांनी याबाबतचा अंतिम निर्णय मा. मंत्री (वने) यांनीच घ्यावा व पुन्हा ही बाब मंडळासमोर मांडण्याची आवश्यकता नाही, असे निर्देश दिलेत. |
| ८.५ | कोलामार्का संवर्धन राखीव क्षेत्र अभयारण्य घोषित करण्याबाबत. | मंडळाचे सदस्य श्री. किशोर रिठे यांनी सादरी करणाच्या माध्यमातून कोलामार्का हे रानम्हशींकरीता कसे उपयुक्त क्षेत्र आहे हे मंडळासमोर मांडले व देशात येथील रानम्हशी या आसाम राज्यातील म्हशींच्याच प्रजातींच्या असल्याचे मंडळाचे निदर्शनास आणून दिले व हे संशोधनाच्या माध्यमातून सिध्द होत असल्याचे त्यांनी मंडळाचे निदर्शनास आणून दिले. | क्षेत्र अतिशय लहान असल्याने तसेच यापूर्वीच ते संवर्धन राखीव म्हणून घोषित केले असल्याने स्थानिकांच्या मदतीने व त्यांच्या भरभराटी करिता उपयुक्त ठरणार असल्याचे मंडळाचे सदस्य श्री. किशोर रिठे यांनी मंडळाचे निदर्शनास आणून दिल्याने हे क्षेत्र रानम्हशींकरीता अभयारण्य घोषित |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | करण्यासाठी प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) तथा मुख्य वन्यजीव रक्षक यांनी त्यांचे स्तरावर अभ्यास करावा. |
| ८.६ | राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीत उपस्थित राहणेकरिता प्रवास खर्च व भत्तेबाबत | मंडळाचे सदस्यांना ऐनवेळेवर रेल्वेने प्रवास करण्याची तिकीट उपलब्ध न झाल्यास त्यांना सदर बैठकीत उपस्थित राहणे अत्यंत आवश्यक असल्यामुळे विमानाने प्रवास करणे आवश्यक असते. त्यामुळे दि. २४/०१/२०१३ रोजी झालेल्या राज्य वन्यजीव मंडळाच्या झालेल्या ७ व्या बैठकीत याबाबत सर्वंकष चर्चा करण्यात आली होती. परंतू शासन निर्णयाप्रमाणे सन्माननीय सदस्यांना प्रवास भत्ता देय राहील असा निर्णय घेण्यात आलेला होता.<br>परंतू बैठकीमध्ये सन्माननीय सदस्यांनी पुन्हा सदरहू मुद्दा उपस्थित केला. | मंडळाचे सदस्यांनी त्यांना ऐनवेळेवर बैठकीत उपस्थित राहणेकरिता रेल्वेने प्रवास करण्याचे तिकीट उपलब्ध होत नसल्याने त्यांना विमानाने प्रवास करण्यास मंडळाने शिफारस केली.<br>विमान आणि रेल्वे यांच्या प्रवास खर्चातील फरकाची रक्कम त्यांचे कार्यक्षेत्रातील व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान यांचे खात्यामधून अदा करण्यात यावी, असे ठरविण्यात येऊन त्यास मंडळाने मान्यता प्रदान केली. |

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य तथा सदस्य सचिव राज्य वन्यजीव मंडळ यांनी आभार प्रदर्शन केले व बैठक संपल्याचे घोषित करण्यांत आले.

==०००==

# महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाची १२ वी बैठक, दि. २६/१०/२०१६

## उपस्थितांची यादी

| अ.क्र. | नांव व पदनाम | पदनाम |
|---|---|---|
| ०१ | मा. श्री. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य. | अध्यक्ष |
| ०२ | मा. सुधीर मुनगंटीवार, मंत्री (वने), महाराष्ट्र राज्य. | उपाध्यक्ष |
| ०३ | श्री. बंटी भांगडीया, विधानसभा सदस्य, चिमुर. | सदस्य |
| ०४ | संचालक, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी यांचे प्रतिनिधी. | |
| ०५ | श्री. बिट्टु सेहगल, सॅंक्च्युरी एशिया, मुंबई. | |
| ०६ | श्री. किरण आर. शेलार, मुंबई. | |
| ०७ | श्री. अनिष अंधेरीया, वन्यजीव तज्ञ. | |
| ०८ | सचिव (वने), महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई. | |
| ०९ | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर. | |
| १० | आयुक्त, पशु संवर्धन विभाग. | |
| ११ | आयुक्त, मत्स्य व्यवसाय विभाग. | |
| १२ | केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयातील संचालक, वन्यजीव यांचे प्रतिनिधी. | |
| १३ | बॉटनिकल सर्वे ऑफ इंडिया यांचे प्रतिनिधी. | |
| १४ | श्री. श्रीकांत टेकाडे, नागपूर. | |
| १५ | श्री. किशोर रिठे, (सातपुडा फाऊंडेशन) अमरावती. | |
| १६ | श्री. हेमेंद्र कोठारी, अध्यक्ष, वाईल्डलाईफ कंझर्वेशन ट्रस्ट. | |
| १७ | श्री. बंडू धोतरे, ईकोप्रो संस्था, चंद्रपूर. | |
| १८ | श्री. मयुर कामत, मुंबई. | |
| १९ | श्रीमती पुनम धनवटे, चंद्रपूर. | |
| २० | श्रीभगवान, मुख्य वन्यजीव रक्षक तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य. | सदस्य सचिव |